# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय,
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २९३** **दिनांक :- १८/१०/२०२१**

## पलायन केलेल्या आरोपीतास भाईंदर पोलीस ठाण्याचे पोलीसांनी केले जेरबंद.

दिनांक १३/१०/२०२१ रोजी सकाळी ०९-०० वा.चे सुमारास भाईदर पोलीस ठाणे हद्दीतील गणेश देवलनगर येथील राहते घरातील रुममध्ये चार्जींग करीता लावलेला मोबाईल फोन कोणीतरी चोरी केल्याबाबत दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा रजि. नं. I ४१९/२०२१ भादंविसक ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद आरोपी नामे दुर्गेश प्रेमचंद गुप्ता वय २० वर्ष रा. साईबाबा मंदिराजवळ, मुर्धागाव, भाईंदर प. यास दिनांक १३/१०/२०२१ रोजी गुन्हे शाखा क्रमांक १, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी शिताफीने ताब्यात घेवुन चौकशी केली असता नमुद आरोपीत याने गुन्हयाची कबुली देवून त्याचे ताब्यातुन नमुद गुन्हयात चोरी केलेला मोबाईल फोन व इतर ३ चोरी केलेले मोबाईल फोन जप्त करण्यात आले होते.

सदर गुन्हयात अटक केलेला आरोपीत दुर्गेश प्रेमचंद गुप्ता यास दि.१४/१०/२०२१ रोजी मा. न्यायालयात हजर करुन पोलीस कोठडी रिमांड घेवुन भाईंदर पोलीस ठाणे येथे परत येत असतांना नमुद आरोपीत हा भाईंदर पश्चिम चेतन वाईन शॉप समोरील रोडवरुन चालत्या गाडीचे खिडकीतुन पोलीसांचे ताब्यातुन पळुन गेला होता. सदर बाबत दि. १४/१०/२०२१ रोजी गुन्हा रजि. नं. I ४२५/२०२१ भादंविसक २२४ अन्वये दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपी हा ॲन्टॉप हिल पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये लपून बसल्याची खात्रिशीर गोपनीय माहिती मिळाल्याने वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सापळा लावून त्यास शिताफिने पकडून अटक करण्यात आली आहे. सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री मुगुटलाल बी. पाटील, पोनि. श्री सागर टिळेकर, सपोनि. श्री विश्वास बाबर, श्री विजय नाईक, पो.उपनिरी. श्री किशोरकुमार नेवसे, किरण कदम, श्री अनिल करे, श्री वैभव धनावडे, पो.ना. परदेशी, मुल्ला, पो.शि./ मुंढे, सानप, कनोजे, बोरसे सर्व नेम. भाईंदर पोलीस ठाणे यांनी केली असून पुढिल तपास चालू आहे.

---ooo---